पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.क्रिडा समिति

कार्यपत्रिका क्रमांक ११

**सभावृत्तांत**

दिनांक - ०८/११/२०१३ वेळ - दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक ०८/११/२०१३ रोजी दुपारी ४.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. बोकड रामदास गेणभाऊ - **सभापती**
२) मा. सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
३) मा. वसंत (नाना) आनंदराव लोंढे
४) मा. प्रसाद शेट्टी
५) मा. आल्हाट धनंजय मुरलीधर

या शिवाय मा.खांडकेकर – सहा.आयुक्त, मा.गावडे – नगरसचिव, मा.पानसरे – क्रिडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने सभा कामकाजामध्ये खालील विषय दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.३) महापौर चषक राज्यस्तरीय सॉफ्टबॉल स्पर्धा २०१३ आयोजित करणेबाबत....

विषय क्र.४) महापौर चषक जिल्हास्तरीय हॅन्डबॉल स्पर्धा २०१३ आयोजित करणेबाबत ...

विषय क्र.५) प्रभाग क्र.५३ वाकड व्यायामशाळेत व्यायामाचे साहित्य पुरविणेबाबत - मा.मंदाकिनी ठाकरे, मा.धनंजय आल्हाट यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) प्रभाग क्र.४७ नढेनगर काळेवाडी व्यायामशाळेत व्यायामाचे साहित्य पुरविणेबाबत - मा.मंदाकिनी ठाकरे, मा.धनंजय आल्हाट यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) प्रभाग क्र.१३ यमुनानगर निगडी येथील मधुकर पवळे क्रिडांगण विकसित करणेबाबत - मा.मंदाकिनी ठाकरे, मा.धनंजय आल्हाट यांचा प्रस्ताव.

----------

ठराव क्रमांक – ४८ विषय क्रमांक – १
दिनांक - ०८/११/२०१३ विभाग - क्रीडा
सूचक – मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक - मा.प्रसाद शेट्टी
संदर्भ - मा.अति.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/७/कावि/१००९/२०१३, दि.२४/१०/२०१३

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

क्रीडा विभागाच्या ७२ पानी क्रीडा धोरणाच्या एकूण १९० प्रती झेरॉक्सकाढणेकामी प्रती पान ०.५० पैसे प्रमाणे ०.५० पैसे X ७२ पाने X १९० प्रती = ६,८४०/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर ७२ पानी क्रीडा धोरणाच्या १९० प्रती बाहेरुन थेट पध्दतीने झेरॉक्स काढून घेणेस व त्याकामी येणा-या र.रु.६,८४०/- चे खर्चास व सदरचा खर्च क्रीडा विभागाचे स्थायी अग्रीमधन रक्कमेतून खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४९ विषय क्रमांक – २
दिनांक - ०८/११/२०१३ विभाग - क्रीडा
सूचक – मा.धनंजय आल्हाट अनुमोदक - मा.प्रसाद शेट्टी
संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/७/कावि/९८७/२०१३, दि.१७/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

क्रीडा विभागाचे खेळाडू दत्तक योजना या लेखाशिर्षावर सन २०१३-१४ करीता केलेली तरतूद र.रु.२०,००,०००/- कमी पडत असल्याने क्रीडा विभागाचे मनपा हद्दीतील मोकळया जागेत प्रत्येक वॉर्डात मैदाने तयार करणे या लेखाशिर्षावर सन २०१३-१४ करीता केलेली तरतूद र.रु.९,००,०००/- ही खेळाडू दत्तक योजना या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक – ५० विषय क्रमांक – ३
दिनांक - ०८/११/२०१३ विभाग - क्रीडा
सूचक – मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक - मा.वसंत लोंढे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/४४/२०१३, दि.३१/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महानगरपालिकेच्यावतीने महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉल असो. व पुणे जिल्हा सॉफ्ट बॉल असो. यांचे मान्यतेने आणि युनायटेड फ्रेंडस स्पोटर्स अकॅडमी, संत तुकाराम नगर, पिंपरी १८

यांचे सहकार्याने वॉर्ड क्र.२८ मासूळकर कॉलनी येथील म.न.पा.डॉ.हेडगेवार क्रीडा संकुल, मासूळकर कॉलनी, पिंपरी १८ येथे माहे डिसेंबर २०१३ मध्ये महापौर चषक राज्यस्तरीय सॉफ्टबॉल स्पर्धा २०१३ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु.४,९४,९००/- चे खर्चास मान्यता व सदर खर्चातील मैदान तयार करणे, स्टेज, मंडप, टेबल, खुर्च्या व्यवस्था खर्च, मैदानावर पाणी फवारणी खर्च हा स्थापत्य विभाग, ब प्रभाग व विद्युत, स्पिकर, माईक व्यवस्था खर्च हा विद्युत विभाग, ब प्रभाग  यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व क्रीडा साहित्य खरेदी, नेट लावणे मजूरी व खेळाडू पंच निवास व्यवस्था खर्च युनायटेड फ्रेंडस् स्पोटर्स अकॅडमी, संत तुकारामनगर, पिंपरी १८ यांचेकडून करणेकामी मा.स्थायी समिति सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५१ | विषय क्रमांक – ४

दिनांक - ०८/११/२०१३ | विभाग - क्रीडा

सूचक – मा.वसंत लोंढे | अनुमोदक - मा.प्रशांत शेट्टी

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/४३/२०१३, दि.३१/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महानगरपालिकेच्यावतीने पुणे जिल्हा हॅन्डबॉल असो. यांचे मान्यतेने व पिंपरी चिंचवड शहर हॅन्डबॉल असो. निगडी प्राधिकरण, सदभावना प्रतिष्ठान यांचे सहकार्याने वॉर्ड क्र.१० तुळजाईवस्ती, अजंठानगर येथील म.न.पा.वसंतदादा पाटील प्राथमिक शाळा आकुर्डी, पुणे ३५ येथे माहे डिसेंबर २०१३ मध्ये महापौर चषक जिल्हास्तरीय हॅन्डबॉल स्पर्धा २०१३ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु.३,७८,०००/- चे खर्चास मान्यता व सदर खर्चातील मैदान तयार करणे, स्टेज, मंडप, टेबल, खुर्च्या व्यवस्था खर्च, मैदानावर पाणी फवारणी खर्च हा स्थापत्य विभाग, अ प्रभाग व विद्युत, स्पिकर, माईक व्यवस्था खर्च हा विद्युत विभाग, अ प्रभाग  यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५२ | विषय क्रमांक – ५

दिनांक - ०८/११/२०१३

सूचक – मा.मंदाकिनी ठाकरे | अनुमोदक - मा.धनंजय आल्हाट

संदर्भ – मा.मंदाकिनी ठाकरे, मा.धनंजय आल्हाट याचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.५३ वाकड (कावेरीनगर पोलिस लाईन) येथील व्यायामशाळेत १) जिंग जॅग बार – ३, २) ऑलंपिक बारबेल – ४ + २ = ६, ३) करलिंग बारबेल - ४ + २ = ६,

४) डमबेल्स २.५ कि. – २ जोडी, ३ कि. - २ जोडी, ४ कि. - २ जोडी, ५ कि. - २ जोडी, ७.५ कि. - २ जोडी, १० कि. - २ जोडी, १२.५ कि. - २ जोडी, १५ कि. - २ जोडी, २० कि. - २ जोडी, २५ कि. - २ जोडी, ३५ कि. - २ जोडी, ४० कि. - २ जोडी, ५) वेट प्लेट – २.५ कि. जोडी, ५ कि. जोडी, १० कि. जोडी, १५ कि. जोडी, २० कि. जोडी, २५ कि. जोडी, ३० कि. जोडी + लॉक, ६) लेग प्रेस मशीन, ७) लेग कर्ल मशीन, ८) सुपर बेंच, ९) लेग एक्सटेंशन मशीन (सिटेड/बसणे), १०) स्टँडींग काप्स मशीन (सिटेड/बसणे), ११) ऑवर हेड प्रेस मशीन, १२) पेक फ्लाईज मशीन, १३) पॉवर केज, १४) लॅट पुल डाऊन, १५) क्रॉस ऑवर, १६) बॅक एक्सटेंशन, १७) फ्लॅट बेंच प्रेस, १८) इनक्लाईन बेंच प्रेस, १९) डिक्लाईन बेंच प्रेस, २०) लेट्रल राईसेस मशीन, २१) पॅरलल बार (स्टॅन्ड) डबल बार, २२) पर्सनल ट्रेनर स्टेशन, २३) रबर मॅट १००० स्क्वेअर फुट, २४) आरशे १० x १० = ४, २५) वजन काटा हे व्यायामाचे साहित्य उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५३ विषय क्रमांक – ६

दिनांक - ०८/११/२०१३

सूचक – मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक - मा.धनंजय आल्हाट

संदर्भ – मा.मंदाकिनी ठाकरे, मा.धनंजय आल्हाट याचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.४७ नढेनगर काळेवाडी गावठाण भागातील व्यायामशाळा दुरुस्त करणेत आली असून पुरेसे व्यायामाचे साहित्य उपलब्ध नसल्याने खेळाडू व नागरिकांची गैरसाय होत असलेने खालीलप्रमाणे – १) आरसे - ३ x ६ = ५ नग, २) डंबेल्स – १५ कि. – ४ नग, ३) डंबेल्स – १० कि. – ४ नग, ४) डंबेल्स – ५ कि. – ४ नग, ५) वेट प्लेट – १५ कि. – ४ नग, ६) वेट प्लेट – १० कि. – ४ नग, ७) वेट प्लेट – ५ कि. – ४ नग, ८) बारवेल बार – ६ फुट – २ नग, ९) बारवेल बार – ५.६ फुट – २ नग, १०) बेंच प्रेस बेंच – १ नग, ११) वजन काटा – १ नग, १२) अडजेस्टेबल बेंच – १ नग व्यायामाचे साहित्य उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५४ विषय क्रमांक – ७

दिनांक – ०८/११/२०१३

सूचक – मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक – मा.धनंजय आल्हाट

संदर्भ – मा.मंदाकिनी ठाकरे, मा.धनंजय आल्हाट याचा प्रस्ताव –

अ प्रभाग कार्यक्षेत्रात प्रभाग क्रमांक १३ यमुनानगर निगडी येथील से.क्र.२१ अंतर्गत आण्णाभाऊ साठे क्रीडांगणाचा समावेश होतो. सदरचे मैदानाचे क्षेत्रफळ सुमारे ४-५ एकर आहे. सदरचे मैदान दाट लोकवस्तीच्या भागात येत असलेने नागरिकांच्या सोयीसाठी १)

जॉगिंग ट्रॅक, २) मैदानाचे सपाटीकरण, ३) हॉलिबॉल कोर्ट, टेनिस कोर्ट, बास्केटबॉल कोर्ट इ., ४) मैदानाचे सुशोभिकरण, वृक्षारोपण, लॉन्स इ., ५) रखवालदार निवासस्थान (watchman quarter), ६) वाहनतळ व्यवस्था (पार्कींग), ७) सिमाभिंत गेट दुरुस्ती, रंग सफेदी, ८) पावसाळी पाण्याची व्यवस्था (SWD) बंद पाईप गटर्स, ९) रात्रीच्या स्पर्धासाठी आवश्यक विद्युत व्यवस्था, हायमास्ट इ., १०) स्टेज इ. स्थापत्य विषयक कामे करणेस तसेच सदर कामाचा अंतर्भाव मनपाच्या सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकात करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(बोकड रामदास गेणभाऊ)
**सभापती**
मा.क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ १०६०/२०१३
दिनांक – १२/११/२०१३

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.